दैनिक
त्रिशक्ती

सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी विद्यार्थिनींना डिजिटल सुरक्षेचे धडे

श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात जनजागृती अभियान; २०० हून अधिक विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग

■ दैनिक त्रिशक्ती
लातूर/तौफीक सत्तार कुरैशी

डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरासोबतच सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही झपाट्याने वाढत असताना विद्यार्थिनींमध्ये सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, लातूर येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्लिक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानांतर्गत आयोजित या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते सातवीतील २०० हून अधिक विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

मंगळवारी सकाळी १०.४० ते ११.३० या वेळेत झालेल्या कार्यक्रमात सायबर वॉरिअर्स जानवी सोरटे व झोहा कोतवाल यांनी विद्यार्थिनींना डिजिटल जगातील संभाव्य धोके आणि त्यापासून स्वतःचे संरक्षण करण्याच्या उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ऑनलाइन गेम्सचे दुष्परिणाम, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) च्या माध्यमातून तयार होणाऱ्या बनावट प्रतिमा, मजबूत पासवर्ड तयार करण्याची पद्धत, मोबाईलमध्ये प इन्स्टॉल करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या टाळाव्यात, याविषयी सोप्या भाषेत माहिती देण्यात आली.यासोबतच ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियावरील सायबर धोके, वैयक्तिक माहितीची गोपनीयता आणि सुरक्षित डिजिटल व्यवहार याबाबतही विद्यार्थिनींना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी विविध प्रश्न विचारत आपल्या शंकांचे समाधान करून घेतले.

विद्यालयाचे मुख्याध्यापिका अचला कदम मॅडम तसेच सर्व शिक्षिकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी विद्यार्थिनींकडून सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्याची आणि सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली.

शालेय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली असून, भविष्यात जबाबदार आणि सुरक्षित डिजिटल नागरिक घडविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.